३७

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १४९/प्रनिप्रा/ 1543 दिनांक : 07 JUL 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, **दिनांक २३जुन, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६२ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व २) संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी वैद्य जातवेद ज. पवार, हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | २३/०६/२०२२ | दुपारी १२:०० वा. | आयुष शिक्षण | पदव्युत्तर पदवी युनानी |
| | | दुपारी ०३:०० वा. | | पदवी आयुर्वेद |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर युनानी व पदवी आयुर्वेद या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाची क्रमांक ६२ वी बैठक दिनांक १९/०५/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतू सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेश बंद दिनांक (Cut-off-date) केंद्र शासनाच्या संबंधीत विभागांनी दिनांक २०/०५/२०२२ पर्यंत मुदत वाढ दिली होती व तद्नुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर युनानी व पदवी आयुर्वेद या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी क्रमांक ६२वी पुढील बैठक दिनांक २३/०६/२०२२ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

२) तथापि, आयुष संचालनालय, मुंबई यांनी क्रमांक आसंमु/आयुष महा./प्रवेश/मान्यता/प्रस्ताव/२०२१-२२/आयु-२/६७९२, दिनांक २१/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये "आयुष अभ्यासक्राच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव तपासणीचे काम संचालनालयामार्फत अंतिम टप्यात असून सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या - त्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची प्रमाणित केलेली यादी सदर महाविद्यालयास देण्यात येईल", असे कळविले आहे.

३) संचालनालयाच्या सदरील विनंतीस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर युनानी व पदवी आयुर्वेद या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाची पुढील बैठक माहे जुलै-२०२२ मध्ये घेण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे.

४) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदव्युत्तर पदव्युत्तर युनानी व पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense व ४) Orphan या संवर्गातून विद्यार्थी प्रवेशित असतील, तर अशा सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या अनुषंगाने प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

५) संबंधित महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर तसेच प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी व उक्त नमूद केल्यानुसार प्रमाणपत्रांची तपासणी/छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदव्युत्तर युनानी व पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकरिता वकिलांचे पटल (Panel) तयार करण्याबाबत.**

माहे जुलै २०२२ पासून प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयाच्या विविध खंडपीठामध्ये न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरिता वकिलांचे पटल तयार करण्याचे प्राधिकरणाचे विचारधीन होते.

या संदर्भात दिनांक २०/०७/२०२१ रोजीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती व तद्नुषंगाने एकुण ५५ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले संबंधीत इच्छूक उमेदवाराची दिनांक १६/०६/२०२२ ते १७/०६/२०२२ या कालावधीमध्ये मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी मुलाखती घेतल्या आहेत. प्रस्तूत प्रकरणी सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश/निर्णय घेण्यात आले,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयाच्या विविध न्यायालयीन प्रकरणी दिनांक २०/०७/२०२१ रोजीच्या जाहिर सुचनेच्या अनुषंगाने मुलाखतीस उपस्थित झालेल्या उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे व त्यानुसार घेण्यात आलेल्या मुलाखतीस अनुसरुन उपस्थित सर्व उमेदवारांची (प्रपत्र - अ) माहे जुलै २०२२ पासून प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरिता वकिलांच्या पटलावर नियुक्ती करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला.

२) मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई, नागपुर व औरंगाबाद खंडपीठांमध्ये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांशी संबंधीत न्यायालयीन पटलावरील सर्व वकिलांना क्रमा-क्रमाने प्रकरणे देण्यात यावी.

३) पटलावरील सर्व वकिलांना शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार व शासकीय दरांप्रमाणे व्यावसायिक शुल्क अदा करण्यात येईल.

४) तसेच नविन वकिलांची नियुक्ती करण्यात आली असल्याने यापूर्वी वकिलांचे स्थापित करण्यात आलेले पटल बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याप्रमाणे संबंधीतांनी पुढील कार्यवाही करावी.

(ख) <u>डॉ. एस.के महाजन यांची सेवा प्राधिकरण व सीईटी कक्षामध्ये पुढील दोन वर्षांकरिता करण्याबाबत.</u>

डॉ. एस.के. महाजन, परिक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण हे नियमित वयोमानानुसार दिनांक ३०/०६/२०२२ रोजी सेवा निवृत्त होणार आहेत. तथापि या संदर्भात सीईटी कक्षाने दिनांक २२/०६/२०२२ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले असता डॉ. एस.के. महाजन यांच्या शासकीय सेवेतील प्रदीर्घ कालावधी व अनुभव पाहता तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे कामकाज प्रगतीपथावर आहे व तद्नुषंगाने अतिमहत्वाच्या व गोपनीय कामकाजाकरिता अनुभवी व जबाबदार अधिकारी असणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेऊन डॉ. एस. के. महाजन यांना प्राधिकरण व सीईटी कक्षामध्ये पुढील दोन वर्षांकरिता परिक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, तथा विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई आणि अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण या पदांवर नियुक्ती करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. डॉ. महाजन यांना शासकीय नियमानुसार अनुज्ञेय असलेले इतर भत्ते तथा वेतन वजा निवृत्ती वेतन या पध्दतीने मासिक वेतन/मानधन अदा करण्यात येईल.

याप्रमाणे संबंधीतांनी पुढील कार्यवाही करावी.

(ग) <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोनही विभागांकरिता वाहने खरेदी करण्याबाबत</u>

याबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकरिता वाहन खरेदी बाबत आर्थिक बोजासह सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा. तद्नंतर प्रवेश नियामक प्राधिकरण यथावकाश कार्यवाही करेल.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 7/7/22